राज्यातील सहकारी संस्था / संघ / बहुराज्यीय संघ / नोंदणीकृत प्रकल्प यांना देय कमिशन दर निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक एमएलके-२०११ /प्र.क्र.१९१/पदुम-८
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१२.

वाचा :-१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग,क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र.१९/पदुम-८, दिनांक ४ फेब्रुवारी, २०११.
२) शासन निर्णय क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र.१८३/पदुम ८, दिनांक ७ जुलै, २०११.
३) शासन निर्णय क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र.१९१/पदुम ८, दिनांक २५ ऑगस्ट, २०११.
४) शासन पुरक पत्र क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र. १९१/पदुम ८, दिनांक.१४ सप्टेंबर, २०११
५) शासन निर्णय क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र.१९१/पदुम ८, दिनांक ३ नोव्हेंबर, २०११

**शासन निर्णय :**

राज्यातील सहकारी संस्था / संघ / बहुराज्यीय संघ /नोंदणीकृत प्रकल्पाचे दूध खरेदी करताना प्रतिलिटर रु. २.९० एवढे कमिशन दिले जाते. दुधाचा पुष्ठकाळ सुरु होत असल्याने शासकीय दूध योजनेकडे होणारा दुध पुरवठा व त्यास उपलब्ध असलेली बाजारपेठ या बाबी विचारात घेऊन कमिशन दरामध्ये सुधारणा करण्याबाबतचा विषय प्रदत्त समितीसमोर विचारार्थ होता.

प्रदत्त समितीच्या दिनांक १७/१०/२०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शासकीय दूध योजनेकडे दुधाचा वाढलेला पुरवठा व बाजारातील इतर दूध व्यावसायीकांमार्फत देण्यात येणारे कमिशन याबाबतचा आढावा घेऊन खालीलप्रमाणे राज्यातील सहकारी संस्था / संघ / बहुराज्यीय संघ /नोंदणीकृत प्रकल्प यांना कमिशन दर निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार या आदेशाद्वारे त्यांना यापुढे कमिशन दर देय राहतील.

| अ.क्र. | तपशिल | प्रति लिटर दुधाकरीता देय कमिशन दर (रु.) |
|---|---|---|
| १ | अंतर्गत वाहतूक | १.२० |
| २ | शितकरण आकार | ०.३५ |
| ३ | व्यवस्थापन खर्च | ०.३० |
| ४ | कॅन खर्च | ०.०५ |
| ५ | संस्था कमिशन | ०.६० |
| | एकूण | २.५० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजय [illegible] पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री (दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या.,गोरेगाव, मुंबई
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर
सर्व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी
सर्व महाव्यवस्थापक / व्यवस्थापक, शासकीय दूध योजना
महालेखापाल ३, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-२)
सर्व कार्यासने (पदुम विभाग)
निवड नस्ती.